# आदेश

क्र.कावि/कक्ष7:2/प्रअभूसं/न.क्र.102/कावि/ 2338 /2021
जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा
दिनांक- 06 / 01 / 2021

विषय :- भूसंपादन प्रकरण क्रमांक 17/2008-09 मौजे येरळी (बुडीत क्षेत्र) ता.नांदुरा प्रारुप निवाडयाकरीता 12 (बारा) महिन्याकरीता मुदत वाढ मिळणेबाबत.

संदर्भः- उपजिल्हाधिकारी भूसंपादन मध्यम प्रकल्प बुलडाणा यांचे पत्र क्र.कावि/अका/म.प्र./525/2020 दिनांक 29/12/2020.(प्राप्त दिनांक 01-01-2021)

*****

ज्या अर्थी उपजिल्हाधिकारी भूसंपादन मध्यम प्रकल्प. बुलडाणा यांनी त्यांच्या संदर्भीय पत्रानुसार भूसंपादन प्रकरण क्रमांक 17/2008-09 मौजे येरळी (बुडीत क्षेत्र) ता.नांदुरा प्रारुप निवाडयाकरीता 12 (बारा) महिन्याकरीता मुदत वाढ मिळणेबाबत प्रस्ताव या कार्यालयात सादर करण्यात आला आहे.

सदर प्रकरणात कार्यकारी अभियंता.जिगांव प्रकल्प पुनर्वसन विभाग,खामगांव यांचे पत्र दि. 22-12-2020 नुसार सदर प्रकरणातील संपादीत जमीनीतील मालमत्तेचे मुल्यांकन करणे झाले नाही तसेच गटावरील घरांचे अंदाजपत्रक बनवून सक्षम स्तरावरुन तांत्रिक मंजुरीसाठी आणखीन काही कालावधीची आवश्यकता असल्याने प्रकरणात एक वर्षाची मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे.

उपजिल्हाधिकारी भूसंपादन म.प्र. बुलडाणा यांनी सदर प्रकरणाची कलम 19 ची अधिसुचना मा. जिल्हाधिकारी यांचे आदेश दिनांक 16-01-2020 नुसार कलम 19 ला मंजुरात मिळालेली आहे.प्रकरणात कलम 21 ची कार्यवाही झाली असून प्रकरण निवाडयाकरीता असून कलम 19 पासून 12 महिन्याचे आंत म्हणजे दिनांक 15-01-2021 पर्यंत निवाडयाची कार्यवाही होणे आवश्यक आहे. परंतु सरदहू प्रकरणात कलम 21 वरील हरकतीवरील अभिप्राय, संपादीत जमीनीतील मालमत्तेचा तसेच फळझाडांचा मुल्यांकन अहवाल तसेच निधी रू. 92 कोटी अप्राप्त असून उपरोक्त कार्यवाहीसाठी काही कालावधी लागणार असल्यामुळें प्रकरणातील निवाडयाच्या कार्यवाहीसाठी बारा(12) महिन्याची मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे.

भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम 2013 चे कलम 25 मध्ये जिल्हाधिकारी,कलम 19 अन्वये घोषणा प्रसिध्द केल्याच्या तारखेपासून बारा महिन्याच्या कालावधीत निवाडा देईल आणि जर त्या कालावधीत निवाडा देण्यात आला नाही तर जमीन संपादनाची संपूर्ण कार्यवाही रद्द होईल.

परंतु,त्याचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असेल तर, समुचित शासनाला बारा महिन्यांच्या कालावधीत वाढ करण्याचा अधिकार असेल.

परंतु आणखी असे की, कालावधी वाढविण्याचा असा कोणताही निर्णय,लेखी स्वरुपात नोंदविण्यात येईल आणि तो अधिसूचित करण्यात येईल आणि संबंधित प्राधिकरणाच्या वेबसाईटवर टाकण्यात येईल.अशी तरतूद आहे.

तरी भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम 2013 चे नियम 25 मधील तरतुदीनुसार भुसंपादन प्रकरण क्रमांक 17/2008-09 मौजे येरळी (बुडीत क्षेत्र) ता.नांदुरा जि.बुलडाणा या प्रकरणात निवाडा करण्यास 12 (बारा) महिन्याची मुदतवाढ देण्यांत येत आहे.

(प्र.कि.दुबे )
जिल्हाधिकारी बुलडाणा